209/14 case close

अर्ज क्रमांक ६१८२/२०१८ दि.चौ./रे.मु./स्पे. मु. २०९/२०१४

कोर्ट कामासाठी/रेकॉर्डसाठी

निशाणी क्रमांक १८४ ओ.

झेरॉक्स पाने १४ प्रत्येकी रु. ४/- प्रमाणे.

..... लिहिणावळ. नकलेकरीता अर्ज दाखल ता. अकरा ऑक्टोबर दोन हजार अठरा.

..... रुजुवात. नकलेच्या अर्जाची पूर्तता ता. सतरा नोव्हेंबर दोन हजार अठरा

..... सरचार्ज. नक्कल देण्याची समज दिली ता. दोन नोव्हेंबर दोन हजार अठरा

..... कागद. नक्कल तयार ता. सतरा नोव्हेंबर दोन हजार अठरा

..... पोस्टेज.

---

५६/-एकूण

---

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर पनवेल.

नक्कल श्री. प्रियांका पोळ यांस दिली.

ता. सतरा नोव्हेंबर दोन हजार अठरा.

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर पनवेल

NOTARY INDIA

I CERTIFY THAT THIS IS TRUE PHOTO COPY FROM ORIGINAL DOCUMENT

SUNITA R. PATIL
NOTARY PUBLIC
Govt.of India CBD-BELAPUR

(6)

निशाणी 5

IN THE COURT OF CIVIL JUDGE, Sr. DIVISION,
PANVEL, AT PANVEL

SPECIAL CIVIL SUIT NO. 209 OF 2014

Mr. Jaganath Yeshwant Deshmukh }...Plaintiff

Versus

Mr. Shivaji Yashwant Deshmukh }

and 14 Ors }...Defendants

APPLICATION ON BEHALF OF DEFENDANT NO. 11 UNDER THE PROVISION OF Or. 1 R. 10 (2) OF CIVIL PROCEDURE CODE, 1908 FOR DELETION OF PARTY.

Other parties to say.
14/9/17.

MAY IT PLEASE YOUR HONOUR

1) Plaintiff has filed the captioned suit for the principle relief of partition, claiming 1/7 share in the alleged joint family properties i.e.,

i) Plot of land bearing nos. 1, admeasuring 3999.98 square meters, at Sector 18, at Ulwe 19B Node, Taluka Panvel, District Raigad and

ii) Plot no. 2, admeasuring 1650 square meters, at Sector 19, at Ulwe 19B Node, Taluka Panvel, District Raigad

Adv. B. B. Kamble
14/9/17
copy Received
behalf plaintiff

along with reliefs of declaration, injunction and other consequential reliefs more particularly set out in Plaint.

Plaint.

2. The stake in the referred plot of land is of seven siblings on account o the death of one or the other, afore stated seven siblings have been arrayed as i.e., Plaintiff and Defendant Nos. 1 to 9. Defendant No. 11 is the transferee of Plot of land bearing nos. 1, admeasuring 3999.98 square meters, at Sector 18, at Ulwe 19B Node, Taluka Panvel, District Raigad from Defendant No. 10, vide tripartite agreement dated 7th January 2008. Defendant Nos. 12 to 15 are Officers of CIDCO Ltd. Defendant No. 9 in the present suit, has also filed a separate suit bearing no. SCS No. 35 of 2014 for identical reliefs as prayed in the captioned suit.

3 This Hon'ble Court by Order dated 30th April 2016, passed below Exhibit 5 and 80, applications for temporary injunction, was pleased to allow the said applications, whereby restraining Defendant No. 11 from constructing and creating third party interest in respect of Plot of land bearing nos. 1, admeasuring 3999.98 square meters, at Sector 18, at Ulwe 19B Node, Taluka Panvel, District Raigad. Being aggrieved and dissatisfied by the Order dated 30th April 2016, the Defendant No. 11 has preferred Appeal from Order No. 630 Of 2016 a/w Civil Application bearing No. 805 Of 2016 before Hon'ble High Court, Bombay. Hon'ble High Court, Bombay by Order dated 27th October 2016 was pleased to dismiss afore stated Appeal from Order.

4. Being aggrieved and dissatisfied by the Order dated 27th October 2016 passed by the Hon'ble High Court Bombay in AO No. 630 Of 2016 a/w CAA No805 Of 2016 preferred Special Leave Petition (Civil) No. 7555 Of 2017 before Hon'ble Supreme Court Of India

.

5. Pursuant to the filing of the Special Leave Petition (Civil) No. 7555 Of 2017 before the Hon'ble Supreme Court Of India, Defendant no. 11 had entered into the settlement with Plaintiff and Defendant Nos. 1 to 8 except Defendant No. 9 i.e. Smt. Sharda Anant Deshmukh (Plaintiff in SCS No. 35 Of 2014), whereby the partis thereto have consented for direction to Defendant Nos. 1 to 9, that none of the parties shall create any encumbrance or third party right in Plot no. 2, admeasuring 1650 square meters, at Sector 19, at Ulwe 19B Node, Taluka Panvel, District Raigad, in view thereof protecting the interest of Defendant No. 9 i.e. Smt. Sharda Anant Deshmukh, Plaintiff in SCS No. 35 Of 2014. Further, the Hon'ble Superme Court Of India, was pleased to set aside the impugned Order dated 27th October 2016 passed by the Hon'ble High Court Bombay in AO No. 630 Of 2016 a/w CAA No. 805 Of 2016 and Orders passed in SLP (Civil) No. 35366 of 2014 with SLP (Civil) No. 1890 of 2015 and Interim Application Nos. 1 and 2 in SLP (Civil) No. 6642 of 2015. Hereto annexed and marked as **Annexure "A"** is the copy of judgement and Order dated 23rd August 2017 passed by Hon'ble Supreme Court of India (Coram: Justice Shri J.S. Khekar and Justice Shri D. Y. Chandrachud).

6. It is therefore submitted that, in light of the settlement arrived by this Defendant with Defendant Nos. 1 to 8, by Order dated 23rd August 2017 the interest of Defendant No. 9, being secured in Plot no. admeasuring 1650 square meters, at Sector 19, at Ulwe 19B Node, Taluka Panvel, District Raigad, the injunction Orders passed by Hon'ble Courts in regard to Plot of no. 1, admeasuring 3999.98 square meters, at Sector 18, Ulwe Node, Taluka Panvel, District Raigad, no more survives.

7. In light of the facts and circumstances as narrated herein above, it is humbly submitted that Defendant No. 11 is no more a necessary party and proper party to the captioned suit as the issue involved in the captioned suit is confined to Plot no. admeasuring 1650 square meters, at Sector 19, Ulwe Node, Taluka Panvel, District Raigad, to which Defendant No. 11 is has no concern, in whatsoever manner.

8. It is therefore prayed that -

(a) This Hon'ble Court be pleased to strike and / or delete the name of Defendant No. 11 from the captioned suit as this Defendant is no more a proper and / or necessary party to the captioned suit, in pursuance to the settlement arrived between Plaintiff, Defendant Nos. 1 to 8 and this Defendant No. 11 and further in pursuance of the Order dated 23rd August 2017 passed in SLP (Civil) No. 7555 Of 2017;

(b) Such others further Orders as this Hon'ble Court deems fit in the interest of principles of natural justice and equity.

Filed in Court,

14th September, 2017

Defendant no. 11

VERIFICATION

I, Hemchand G. Gala, age: 65 years, Indian Inhabitant, Director of M/s. Himax Developers Private Limited, a Company incorporated under the provisions of Companies Act, 1956, Having address at - Shop No. 5, D. S. Trade Center, Station Road, Vidhyavihar (West), Mumbai 400 086, the Defendant No. 11 in the above matter and a man conversant with the facts of the case, do hereby state on solemn affirmation that the contents of Paragraph Nos. 1 to 8 hereof are true to my own knowledge, belief and information and the contents of Paragraph Nos. 1 to 8 hereof are believed by me to be true and correct upon information received by me and believed by me to be true, in testimony whereof I accordingly verify the contents of the application filed under Or. 1 R. 10(2) of Civil Procedure Code, 1908 and in testimony whereof I put my hand hereto at Panvel on this 14th day of September, 2017

Filed in Court

14th September, 2017

Deponent

Advocate

स्पे. मु. नं. २०९/२०१४

श्री. जगन्नाथ यशवंत देशमुख .....वादी

वि.

श्री. शिवाजी यशवंत देशमुख ....प्रतिवादी

## निशाणी क.१९४ वर आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी क. ११ ने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०१ नियम १०(२) अन्वये या दाव्यातून त्यास वगळण्याकामी केला आहे.

२. प्रतिवादी क. ११ ची थोडक्यात हकिकत अशी की, वादीने सदरचा दावा वाटप, ठराव आणि निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. सदरचे वाटप त्याने भुखंड क. ०१, सेक्टर क. १८, उलवे नोड १९ब, क्षेत्र ३९९९.९८ चौ. मी, तालुका-पनवेल जिल्हा-रायगड व भुखंड क. ०२, सेक्टर क. १९, उलवे नोड १२ब, क्षेत्र १६५० चौ. मी., तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड मध्ये त्याचा १/७ हिस्सा असल्याची मागणी केली आहे.

३. दावा भुखंडात कै. यशवंत देशमुख यांचे सात वारसांचे सात हिस्से आहेत. प्रतिवादी क. ११ ने भुखंड क. ०१ क्षेत्र ३९९९.९८ चौ. मी. हा दिनांक ०७/०१/२००८ रोजीच्या त्रिपक्षीय करारान्वये खरेदी केला आहे. या दाव्यातील प्रतिवादी क. ०९ ने स्वतंत्र विशेष दिवाणी दावा क. ३५/२०१४ अशा प्रकारचा दाखल केला आहे. या दाव्यातील निशाणी क. ०५ आणि ८० वरील दिनांक ३०/०४/२०१६ रोजी या न्यायालयाचे आदेशानुसार अंतरिम हुकुमनाम्याचा अर्ज मंजूर करुन प्रतिवादी क. ११ विरुध्द दावा मिळकतीत त्रयस्थ ईसमांचे हक्क निर्माण करु नये आणि त्यावर

बांधकाम करु नये असा अंतरिम मनाई हुकुम पारित केला आहे. प्रतिवादी क्र. ११ ने त्या आदेशाविरुध्द नाम. उच्च न्यायालयात ए.ओ. क्र. ६३०/२०१६ सह दिवाणी अर्ज क्र. ८०५/२०१६ दाखल केला होता. नाम. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २७/१०/२०१६ रोजीच्या आदेशानुसार ते अपिल खारीज केले. त्यास प्रतिवादी क्र. ११ ने नाम. सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पिटीशन (सिव्हील) क्र. ७५५५/२०१७ द्वारे आव्हान दिले होते. नाम. सर्वोच्च न्यायालयात प्रतिवादी क्र. ०१ ते ०८ आणि प्रतिवादी क्र. ११ यांच्या मध्ये तडजोड झाली. त्या तडजोडीनुसार प्रतिवादी क्र. ०१ ते ०८ यांनी भुखंड क्र. ०२ क्षेत्रफळ १६५० यामध्ये त्रयस्थांचे हक्क प्रस्थापित करु नये असे ठरले. तसेच प्रतिवादी क्र. ०९ नामे शारदा अनंत देशमुख हिच्या हिश्श्याचा हक्क भुखंड क्र. ०२ मध्ये राखून ठेवला. नाम. सर्वोच्च न्यायालयाने नाम. उच्च न्यायालयाचे दिनांक २७/१०/२०१६ रोजीचे ए.ओ. क्र. ६३०/२०१६ मधील आदेश रद्द केला.

४. नाम. सर्वोच्च न्यायलयाने दिनांक २३/०८/२०१७ रोजीच्या आदेशानुसार प्रतिवादी क्र. ०९ चे हक्क भुखंड क्र. ०२ मध्ये संरक्षित करुन प्रतिवादी क्र. ०१ ते ०८ आणि प्रतिवादी क्र. ११ विरुध्दचा अंतरिम मनाईचा आदेश रद्द केला आहे. भुखंड क्र. ०१, क्षेत्र ३९९९.९८ चौ. मी., सेक्टर नं. १८, उलवे नोड १९बी, ता. पनवेल, जि. रायगड बाबतचा अंतरिम मनाई हुकुमाचा आदेश आज अस्तित्वात राहिला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ११ हा या दाव्यातील आवश्यक व योग्य पक्षकार राहिलेला नाही. भुखंड क्र. ०२ क्षेत्र १६५० चौ. मी. शी प्रतिवादी क्र. ११ चा काहीही संबध नाही. त्याने

सदरचा अर्ज मंजूर करुन त्यास या दाव्यातून वगळण्याची विनंती केली आहे.

५. सदरच्या अर्जास वादीने कोणतेही म्हणणे दाखल केलेले नाही तसेच प्रतिवादी क्र. ०१ ते ०८ यांनी या अर्जास म्हणणे सादर केलेले नाही.

६. प्रतिवादी क्र. ०९ ने दिनांक २४/१०/२०१७ रोजी म्हणणे दाखल करुन तिने या अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादी क्र. ११ ला सदरचा अर्ज करण्याचे कोणतेही कायदेशीर कारण घडलेले नाही. त्याने नाम. सर्वोच्च न्यायलयाचे स्पेशल लिव्ह पिटीशन (सिव्हील) क्र. ७५५५/२०१७ मधील दिनांक २३/०८/२०१७ रोजीच्या आदेशाचा जाणीवपूर्वक चुकीचा अर्थ काढून हा अर्ज दाखल केला आहे.

७. दावा मिळकतीमध्ये वादी आणि प्रतिवादी क्र. ०१ ते ०९ सरसनिरस वाटप होवून मिळण्याकरीता आणि त्यामध्ये वादीचा अविभक्त १/७ हिस्सा निर्तुटक करुन त्याचा ताबा मिळण्याकरीता, दावा भुखंड क्र. १ च्या मिळकतीचा प्रतिवादी क्र. १ च्या लाभातील भाडेपट्टा करार व प्रतिवादी क्र. १० च्या लाभातील तथाकथीत त्रिपक्षीय करार आणि प्रतिवादी क्र. ११ च्या लाभातील त्रिपक्षीय करार बेकायदेशीर असून ते वादीवर बंधनकारक नसल्याचे जाहीर होवून मिळण्याकरीता आणि मनाई हुकुमाकरीता दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ०९ ने निशाणी क्र. ५८ कडील कैफियत दाखल करुन तिने वादीचा दावा कबुल केलेला असून दावा मिळकतीतील तिचा १/७ हिस्सा मागणी केला आहे. तसेच तिने दावा मिळकत

वाटप करुन मिळण्यासाठी याच न्यायालयात विशेष दिवाणी दावा क. ३५/२०१४ हा दाखल केला आहे. त्यातील निशाणी क. ०५ कडील अर्जावर या न्यायालयाने दिनांक २४/०२/२०१४ रोजी आदेश करुन तो मंजूर केला. प्रतिवादी क. ०९ ने नाम. सर्वोच्च न्यायलयाचे एस.एल.पी. क. ३५३६६/२०१४ दाखल केले होते. नाम. सर्वोच्च न्यायलयाने दिनांक १८/१२/२०१४ रोजी विशेष दिवाणी दावा क. ३५/२०१४ या दाव्यातील प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण करु नये असा अंतरिम मनाई हुकुम पारित केला आहे.

८. प्रतिवादी क. ११ ने नाम. सर्वोच्च न्यायालयामध्ये एस.एल.पी. क. ७५५५/२०१७ दाखल केले आहे. त्या प्रकरणात प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क. ०१ ते ०८ आणि प्रतिवादी क. ११ यांच्या दरम्यान तडजोड झाली. त्या तडजोडीस प्रतिवादी क. ०९ ही सहभागी नव्हती. ती तडजोड प्रतिवादी क. ०९ वर बंधनकारक नसल्याचे तिला वाटते. नाम. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या आदेशात प्रतिवादी क. ११ ला दाव्यातून काढून टाकावे असे नमुद केलेले नाही अगर तसा कोणताही हुकुम पारित केलेला नाही. प्रतिवादी क. ११ ने केलेली मागणी चुकीची आहे. तसेच प्रतिवादी क. ११ हा या दाव्यात आवश्यक व योग्य पक्षकार आहे. त्यास या दाव्यातून काढून टाकल्यास वादीच्या दाव्यातील पर्यायाने प्रतिवादी क. ०९ हिच्या बचावावरही विपरित परिणाम होईल. त्यामुळे तिचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. तिने सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली.

९. सदरचा अर्ज, म्हणणे आणि कागदपत्रांचे आवलोकन करुन

प्रतिवादी क्र. ०९ आणि ११ च्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

१०. दाव्यातील निशाणी क. ०५ आणि ८० वरील अंतरिम अर्ज या न्यायालयाने दिनांक ३०/०४/२०१६ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करुन प्रतिवादी क. ११ ने दावा भुखंडात त्रयस्थाचे हक्क निर्माण करु नये व त्यावर बांधकाम करु नये असा अंतरिम मनाई हुकुम पारित केला होता. त्यावर प्रतिवादी क्र. ११ ने नाम. मुंबई उच्च न्यायालयात दिवाणी अपिल क. ६६/२०१६ दाखल केले होते. ते नाम. उच्च न्यायालयाच्या दिनांक २७/१०/२०१६ रोजीच्या आदेशाने खारिज झाले. त्याविरुध्द प्रतिवादी क. ११ ने नाम. सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी. क. ७५५५/२०१७ दाखल केले होते. त्यामध्ये वादी, प्रतिवादी क. ०१ ते ०८ आणि प्रतिवादी क्र. ११ यांच्यामध्ये तडजोड झाली. त्या तडजोडीनुसार या दाव्यातील प्रतिवादी क. १ ते ०८ यांनी प्रतिवादी क. ०९ चे दावा मिळकतीतील हक्क भुखंड क्र. ०२ क्षेत्र १६५० चौ. मी. मध्ये संरक्षित करावयाचे ठरले. त्यानुसार नाम. सर्वोच्च न्यायालयाने या दाव्यातील दावा भुखंड क्र. ०१ मधील अंतरिम मनाई हुकुम आदेश रदद केला. दावा भुखंड क्र. ०१ बाबतचा त्रिपक्षीय करार प्रतिवादी क्र. ११ च्या हक्कात करुन दिलेला आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ०९ चे हक्क दावा भुखंड क. ०२ मध्ये संरक्षित ठेवले आहे. त्या तडजोडीनुसार प्रतिवादी क. ११ चा दावा भुखंड क. ०२ शी कोणताही हक्क संबंध राहिलेला नाही.

११. प्रतिवादी क्र. ११ तर्फे ॲड. सचदेव यांनी युक्तीवाद केला की, नाम. सर्वोच्च न्यायालयासमोरील झालेल्या तडजोडीनुसार वादी व प्रतिवादी क. ०१ ते ०८ यांनी दावा भुखंड क. ०१ मधील त्यांचे

हक्क सोडून दिले असून त्यातील प्रतिवादी क. ०९ चे हक्क दावा भुखंड क. ०२ मध्ये संरक्षित ठेवले आहेत. तसेच नाम. सर्वोच्च न्यायलयाने या न्यायालयाचा दिनांक ३०/०४/२०१६ रोजीचा आणि नाम. उच्च न्यायालयाचा दिनांक २७/१०/२०१६ रोजीचा आदेश दावा भुखंड क. ०१ च्या हिश्श्यापर्यंत रद्द केले आहेत. प्रतिवादी क. ११ चा हक्क फक्त दावा भुखंड क. ०१ बाबत असून त्याचा दावा भुखंड क. ०२ शी काहीही संबध नाही. वादीच्या अनुमतीमने दावा भुखंड क. ०१ हा प्रतिवादी क. ११ च्या लाभांत हस्तांतरीत झाला आहे. तसेच अंतरिम मनाई हुकुम आदेशही प्रतिवादी क. ११ विरुध्द रद्द झाला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क. ११ हा या दाव्यातील आवश्यक व योग्य पक्षकार राहत नाही. त्यास या दाव्यातून वगळणे आवश्यक आहे. त्यांनी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

१२. ॲड. जे. एन. उरणकर यांनी प्रतिवादी क्र. ०९ तर्फे युक्तीवाद केला की, प्रतिवादी क. ११ ला सदरचा अर्ज दाखल करण्याची कोणतेही कारण घडलेले नाही. सदरचा अर्ज बेकायदेशीर आहे. प्रतिवादी क. ०९ ने या दाव्यातील वादी व ईतर प्रतिवादींविरुध्द सुध्दा विशेष दिवाणी दावा क. ३५/२०१४ दाखल केला आहे. या दाव्यातील दावा मिळकत आणि त्या दाव्यातील दावा मिळकत या त्याच आहेत.

१३. प्रतिवादी क. ११ ने नाम. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले एस.एल.पी. क. ७५५५/२०१७ मधील तडजोडीमध्ये प्रतिवादी क. ०९ ही पक्षकार नव्हती. त्या तडजोडीस तिने संमती दिलेली नाही. त्यामुळे ती तडजोड प्रतिवादी क. ०९ वर बंधनकारक होवू

शकत नाही. नाम. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २३/०८/२०१७ रोजीचे आदेशामध्ये प्रतिवादी क्र. ११ ला या दाव्यातून वगळण्याबाबतचा हुकुम केलेला नाही. प्रतिवादी क्र. ११ ने सदरचा अर्ज पश्चात बुध्दीने आणि कोर्टाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ काढून दिला आहे. सदरचा दावा वादीने दावा मिळकतीचे वाटप करुन मिळणेसाठी, झालेला त्रिपक्षीय करार बंधनकारक नसल्याचे जाहीर करुन मिळण्यासाठी व मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ११ हा या दाव्यात आवश्यक व योग्य पक्षकार आहे. सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी क्र. ०९ चे अपरिमित नुकसान होईल आणि तिच्या बचावावर विपरित परिणाम होईल. त्यांनी सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली.

१४. नाम. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक २३/०८/२०१७ रोजीचे एस.एल.पी. क्र. ७५५५/ २०१७ मधील आदेशानुसार वादी, प्रतिवादी क्र. ०१ ते ०८ आणि प्रतिवादी क्र. ११ मध्ये तडजोड झाली. नाम. सर्वोच्च न्यायालयाने परिच्छेद क्र. ०७ मध्ये नमुद केले आहे की, "या तडजोडीद्वारे प्रतिवादी क्र. ०९ चे हक्क १६५० चौ. मी. क्षेत्राच्या भुखंडात यातील संरक्षित केले असून ते पुरेसे आहेत. तसेच त्या अर्जातील पक्षकारांनी १६५० चौ. मी. च्या भुखंडावर कोणताही बोजा अथवा त्रयस्थांचे हक्क निर्माण करु नये" असा आदेश पारित केला. नाम. सर्वोच्च न्यायालयाने या न्यायालयाचे व नाम. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश रददबातल केले.

१५. नाम. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक २३/०८/२०१७ रोजीच्या आदेशानुसार प्रतिवादी क्र. ०९ चे हक्क १६५० चौ. मी. भुखंडात संरक्षित ठेवलेले आहेत. तसेच ३९९९.९८ च्या भुखंडाबाबत ते

अंतरिम मनाई आदेश नाम सर्वोच्च न्यायालयाने रद्द बातल केले आहेत. म्हणजेच प्रतिवादी क. ११ विरुध्द आज रोजी कोणताही अंतरीम मनाई आदेश अस्तित्वात राहिलेला नाही. तसेच या अर्जास वादीतर्फे कोणतीही हरकत नोंदविण्यात आलेली नाही. यावरुन वादीस दावा भुखंड क. ०१, क्षेत्र ३९२९.२८ चौ. मी. बाबत कोणतीही हरकत असल्याचे दिसत नाही. केवळ प्रतिवादी क. ०९ ने या अर्जास हरकत नोंदविली आहे. तिची हरकत मला योग्य वाटत नाही. सदरचा अर्ज मंजूर करणे मला योग्य वाटते. या अर्जाचा खर्च दोन्ही पक्षांनी आपापला सहन करावा. म्हणून, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: आदेश ::

१. सदरचा अर्ज मंजूर केला.
२. वादीने प्रतिवादी क. ११ ला या दाव्यातुन वगळावे.
३. वादीने या आदेशाप्रमाणे पुढील तारखेस अथवा पुर्वी दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत हजर कराव्यात.
४. दोन्ही पक्षांनी आपापला खर्च सहन करावा.

पनवेल
दि.२२.१०.२०१८

(ए. यु. बहिर)
२रे सह दिवाणी न्यायालय,व. स्तर, पनवेल